**मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित , औरंगाबाद यांचे सन २०२१-२२ चा ५५ वा वार्षिक अहवाल विधिमंडळास सादर करण्यास झालेल्या विलंबाची कारणे :-**

- मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांनी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचा ५५ वा वार्षिक अहवाल तयार करुन संचालक महामंडळाकडे सादर केला असता, संचालक मंडळाने दिनांक १६.०९.२०२२ रोजी सदर लेखा अहवालास मान्यता दिली.

- तद्नंतर दिनांक २०.१०.२०२२ रोजी सदर वार्षिक अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे अभिप्राय घेण्याकरीता महालेखापाल कार्यालय ( लेखा परिक्षा ) मुंबई यांचेकडे पाठविण्यात आला.

- सदर अहवालावर महालेखाकार ( वाणिज्यिक लेखापरिक्षा ), मुंबई यांचे अभिप्राय दिनांक ०२.०१.२०२३ रोजी मराठवाडा विकास महामंडळास प्राप्त झाले.

- सदर वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल मराठवाडा विकास महामंडळाच्या भागधारकांनी दिनांक ०५.०६.२०२३ रोजी स्विकृत केला.

- मराठवाडा विकास महामंडळाने दिनांक १७.०७.२०२३ रोजी सदर अहवालाच्या इंग्रजी व मराठी प्रती छपाईसाठी पाठविल्या .

- तद्नंतर मराठवाडा विकास महामंडळ मर्या., औरंगाबाद यांनी दिनांक २०जुलै, २०२३ च्या पत्रान्वये सदर अहवाल ( मराठी व इंग्रजी एकत्रित ) शासनास सादर केलेला आहे.

उपरोक्त कारणांमुळे मराठवाडा विकास महामंडळ मर्या., औरंगाबाद यांचा सन २०२१ - २२ या आर्थिक वर्षाचा ५५ वा वार्षिक अहवाल मा. विधिमंडळास सादर करण्यास विलंब झालेला आहे .

( संजय देगांवकर )
सहसचिव